
संत शिरोमणी
रविदास महाराज

मन चंगा तो कठोती में गंगा !

संपादकीय सल्लागार : मा. पंढरीनाथ पवार

ई-मासिक

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र

# अधिकृत RCM


आशिर्वाद

मा.श्री.बबनराव (नाना) घोलप
माजी समाजकल्याण मंत्री, महाराष्ट्र

adhikrutrcm@gmail.com

वर्ष : १, अंक : ५, जानेवारी २०२१, पाने : ४

संपादक : डॉ. शांताराम पां. कारंडे


**जा देखे घनि उपजै, नरक कुंड में बास**
**प्रेम भगति सों ऊधरे, प्रगटत जन रैदास**

ज्या रविदासांना पाहून लोकांना घृणा यायची, ज्या रविदासांचे वास्तव्य स्थान हे नरक कुंडासमान वाटायचे, त्याच रविदासांना इश्वरभक्तीत लीन झालेलं पाहून रविदासांचा मानवजातीत पुन्हा नव्याने जन्म झाला, असेच मानावे लागेल.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या मुंबईतील नियक्त्या जाहीर



**मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबईतील समस्त चर्मकार बांधवांचा पदाधिकारी मेळावा व पदनियुक्ती कार्यक्रम चर्मकार हृदयसम्राट, क्रांतिकारी नेते व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दि. २४ डिसेंबर २०२० रोजी सायं. ५ वा. स्थळ : प्रज्ञा बोधिनी इंग्लिश शाळा, जय प्रकाश नगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे पार पडला. सदर मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून मान. स्थानिक नगरसेविका सौ. साधनाताई माने, शिक्षण समिती अध्यक्षा व नगरसेविका सौ. संध्या दोषी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय सल्लागार मा. श्री. पंढरीनाथ पवार, राष्ट्रीय सचिव मा.श्री. उमाकांत डोईफोडे व श्रीम. सरोज बिसुरे, राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. श्री. अर्जुनराव वाघमारे, प्रदेश कार्याध्यक्ष मा. डॉ. शांताराम कारंडे, राज्य उपाध्यक्षा सौ. संगीता खोदाना व विभागीय निरीक्षक राजू नेटके इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात मुंबईतील खालीलप्रमाणे काही निवडक नियुक्त्या करण्यात आल्या.

श्री. राजेश खाडे यांची मुंबई विभागीय अध्यक्ष, अशोक देहरे यांची मुंबई विभागीय कार्याध्यक्ष, सचिव पदी संजय जाधव, उपाध्यक्ष पदी जगदीश लाड, सुरेश काळे, सूर्यकांत आंबेकर, सल्लागार पदी ऍड. प्रदीप सोनवणे, डॉ. शशिकांत बामणे, संजय सोनवणे, शहराध्यक्ष पदी गणेश खाडे, दादाभाऊ माने, जिल्हाध्यक्ष पदी राजेश शिंदे, जयंत वसईकर, सुनील कांबळे, नरेंद्र गुजराती, दीपक माने व इतर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आदरणीय नानांच्या शुभहस्ते करण्यात आल्या.

















## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्यावतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सोहळा!

**अमरावती** : भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभु येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५४ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य राष्ट्रिय चर्मकार महासंघ अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या उपस्थित महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

टाकरखेडा संभु येथील पोलिस पाटील अजय मोहकर यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.गजानन तायडे तर प्रमुख अतिथी राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,पोलिस पाटील अजय मोहकर,सामाजिक कार्यकर्ते जानराव मोहकर हे होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने अभिवादन करण्यासाठी दरवर्षी ६ डिसेंबर रोजी दादर येथील चैत्यभूमीवर लाखो अनुयायांचा जनसागर उसळतो.यंदा मात्र करोनाचे संकट असल्याने चैत्यभूमीवर न जाता आपापल्या घरातूनच बाबासाहेबांना अभिवादन करावे लागले. यावर्षी महापरीनिर्वाण दिनानिमित्य यावेळी करोनामुळे आपापल्या घरीच अभिवादन करण्यात आले.टाकरखेडा संभु येथे यावेळी जानराव मोहकर,सुनिल डोंगरे,वेणुबाई मोहकर,श्रीमती पुष्पाताई जामठे,सौ.सोनाली जामठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ, नागपूर आयोजित वधू-वर परिचय मेळावा!

**नागपूर (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ, नागपूर तर्फे आपल्या विवाह योग्य मुला-मुलींसाठी योग्य स्थळ शोधण्यासाठी होणारा खर्च व वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी सामाजिक दायित्व स्विकारून मागील ७ वर्षापासून वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे.


रेशीमगाठी परिचय पुस्तिका द्वारे अनेक उपवर वधूंचे लग्न जुळले आहेत. यावर्षी शुक्रवार दि १९ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ११-००वाजता संत रविदास सांस्कृतिक सभागृह,विमा दवाखान्याजवळ, हनुमान नगर, मानेवाडा रोड, नागपूर येथे परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी बहुरंगी रेशीमगाठी वधू-वर परिचय पुस्तिका प्रकाशित करण्यात येणार आहे.त्यामध्ये आपले नातेवाईक , परिचित यांना बायो डेटा व फोटो ३१-०१-२०२१ पर्यंत देण्यासाठी कळवावे ही विनंती.

■ नोंदणी निःशुल्क आहे.पुस्तिकेची किंमत २००/- आहे. मागविल्यास पोस्टाने/कूरिअरने पुस्तिका पाठवण्यात येईल.

■ वॉटस ऍपद्वारे ८२७५३९२८१२ या नं.वर बायोडेटा व फोटो पाठवावा.

■ यावेळी गरजू वर-वधूंचे लग्न लावून देण्यात येईल. ■ ही माहिती आपल्या नातेवाईकांपर्यंत पोहोचवावी असे आयोजकांनी कळवले आहे.



# संपादकिय

## नवीन वर्षाचे स्वागत विचाराने करा!
## हिंदू म्हणून जगा! पण यांना विसरू नका!!

**डिसेंबर महिना हा जुन्या वर्षाचा शेवटचा महिना आणि नवीन वर्षाची आतुरतेने वाट पहाण्यास लावणारा महिना आहे. तसा डिसेंबर महिना दलित बहुजन हिंदू समाजातील सकल जनांच्या न्याय हक्कासाठी लढणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिनाचा महिना आहे. दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे निर्वाण झाले, तेव्हा ही बातमी ऐकून आपल्या मुलाचे निधन झाल्यावर आपले किर्तन बंद न करता ! ऐसे मेले कोट्यांन कोटी ! काय रडू मी एकल्या साठी ! असे म्हणणारे कर्मयोगी संत गाडगे बाबा दुःखी झाले, त्यांचे डोळ्यातून अश्रू वाहू लागले आणि त्यांनी अन्नत्याग केला आणि १४ दिवसांनी आपला प्राण त्याग केला, त्यांची पुण्यतिथी देखील याच डिसेंबर महिन्यात येते २० डिसेंबर १९५६ रोजी !**

खर तर समाजातील बहुजन समाजाला अंधश्रद्धेतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सातारा येथील दान मिळालेली जागा दिली आणि ती जागा कर्मवीर भाऊराव पाटील यांना दिली. आज रयत शिक्षण संस्थेचे कार्यालय तेथ साकार झाले. तसेच दिन दलिताचे कैवारी दक्षिण भारतातील केरळ राज्यातील रामास्वामी पेरीयन नायकर यांचे निधन देखील २४ डिसेंबर १९७३ ला याच महिन्यात येते. त्यांनी तर संपूर्ण देशात भ्रमंती केली आणि सर्व युरोप खंडाचा प्रवास केला. ब्राह्मणवाद यावर जबरदस्त प्रहार केला. दिन दलिताचे कैवारी म्हणून काम करीत असतांना त्यांनी तुरूंगवास देखील भोगला. सन १९५४ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि रामास्वामी पेरियर यांची ब्रम्ह देशात प्रथम भेट झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ऐकून रामास्वामी पेरियर बौध्द धर्माकडे आकर्षित झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी रायगडच्या पायथ्याला अखिल मानव जातीला व स्त्रीला हजारो वर्षे गुलामगिरीत ठेवणारे मनुस्मृती या ग्रंथाचे दहन केले. तो दिवस ही याच डिसेंबर महिन्यात येतो, परंतु या घटनेचे कोणालाही स्मरण असेल असे मला तरी वाटत नाही. पण याच महिन्यात जोडून येणारा मराठी महिना मार्गशिर्ष संपूर्ण हिंदू - दलीत व सर्व बहुजन समाजातील महिला या सर्वांना कायम स्मरणात राहातो आणि त्यातल्या त्यात महिलांचा ऊत्साह तर द्विगुणीत होतो, कारण ही तसेच आहे. मार्गशीर्षचे गुरूवार ऊपवासाचे, कर्म कांडल्याचे दिवस म्हणून प्रचलित आहेत. महालक्ष्मीची पुजा काय तो थाट, पोथी वाचन, गोड जेवण, देवीला नैवेद्य, पाच पोथ्या सुहासिनीला वाटप या व अशा अंधश्रद्धाळू हिंदु दलित व बहुजन समाजातील सर्वानी आपली बुध्दी गहाण ठेवली आहे काय? कुठे गेले ते संतोषी माता व्रत, सारासार विचार करण्याची, सत्य काय ? असत्य काय ? याची चिकीत्सा करण्याची क्षमता शिक्षण घेऊन पण कुणाकडे राहीली नाही. आमच्या महिला शिक्षण घेऊन साक्षर तर झाल्या मात्र समजदार व्हायच्या राहिल्या असे या प्रकारावरून वाटते.

२६ डिसेंबर हा चर्मकार समाजातील सरदार उधम सिंग यांचा जन्म दिन असून या महान क्रांतीकारकाचे कुणालातरी स्मरण आहे का ? या क्रांती विरान जालीयनवाला बाग येथील येथील हत्याकांडाचा बदला घेवून जनरल डायसची इंग्लड मध्ये जाऊन गोळ्या झाडून हत्या केली, आणि याच दिवसी आपल्या देशाचे माजी प्रधानमंत्री व्ही.पी.सिंग यांचे निधन झाले, असून त्यांनीच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती निमित्ताने सुट्टी जाहीर केली. संसद भवनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लाऊन त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले,आणि ओबीसी समाजाला मंडल आयोग लागू करून आरक्षण लागू केले, पण त्यांचे पुण्यस्मरण कुणालाही होत नाही, हेच खरे दलीत व ओबीसी समाजाचे दुर्दैव आहे.

नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच १ जानेवारी या दिवशी ५०० महार समाजातील मावळ्यांनी पेशवाईचे कंबरडे मोडले आणि इतिहास घडविला म्हणून भिमा कोरेगांवला स्मारक उभारले असून हा दिवस शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो याचे ही आपल्याला काही घेणे देणे नाही,असेच आपण वागतो,आणि ३ जानेवारी या दिवशी तर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म दिवस महिलांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी शेण,दगड,माती झेलली आणि पहीली मुलींची शाळा सुरू केली,त्यासाठी त्या अगोदर शिकल्या,त्यांना शिकविणारे त्यांचे पती थोर समाज सुधारक व सत्य शोधक समाजाची स्थापना करणारे महात्मा जोतिबा फुले होत, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पुण्यात प्रथम सुरू केली,पण यांचा आणि आमचा काय संबंध आहे असे समजणारे आपण काय करतो ? कशासाठी करतो ? शाब्बास माझ्या समाजातील नेत्यांनो,आणि काय आपलं समाज कार्य समाजाला आपण कुठे घेऊन चाललो आहे ? आपण हिंदू म्हणून जगत असतो, पण आता खरोखरच काही सनातनी शक्ती डोके वर काढत आहेत. पुन्हा चातुवर्ण्य व्यवस्था लावु पहात आहेत. म्हणून आता आपण सावध झाले पाहिजे ? आता आपण समाजाला योग्य दिशा देण्याची वेळ आली आहे,जरा अंतर्मुख होऊन विचार आपण करणार नाही तर कोण करणार ? अन्यथा समाजातील महिला, मुली व समाज बांधव यांचेवर होणारे अन्याय, अत्याचार व हल्ले गाव खेड्यात चालू राहतील. आपल्या पुढील पिढीला व तरुणांना आपण काय देणार म्हणून एकदा सहजतेने विचार करा ? वेळीच सावध व्हा ! आणि नवीन वर्षाचे स्वागत म्हणून परिवर्तनाच्या विचाराचा संकल्प करा.

जय रविदास ! जय शिवराम ! जय भीम !



**पंढरीनाथ पवार**
राष्ट्रीय सल्लागार
राष्ट्रीय चर्मकार महासंघ
■ 98202 58049

डॉलर च्या तुलनेत पडणारा रुपया सावरण्यासाठी सरकारला परकीय चलनाची विक्री करावी लागते, त्यामुळे भविष्यात आपल्याकडचे परकीय चलन देखील प्रमाणापेक्षा कमी झाले तर आश्चर्य वाटून घेऊ नका.

# प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने...

**एखाद्या देशाची आंतरराष्ट्रीय आर्थिक पत मोजण्यासाठी त्या देशाकडे किती परकीय चलन आहे हे प्रथम पाहिले जाते. आणि मग त्यानंतर त्या देशातील केंद्रीय बँकेच्या आरक्षित खात्यामध्ये किती सोनं किंवा पैसे आहेत यावर त्या देशाची पत ठरवली जाते. त्यानुसार एखाद्या देशाला आंतराष्ट्रीय पातळीवर किती कर्ज द्यायचे किंवा द्यायचे नाही हे देखील ठरवले जाते.**

अंदाजे ८४ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बॅलन्स शीट मध्ये गेल्या आजतागायत कमावलेले नऊ लाख करोड रुपये आहेत. त्यातील एक लाख श्याहत्तर हजार करोड रुपये रिजर्व बँकेने नुकतेच भारत सरकारला दिले असं म्हणण्यापेक्षा भारत सरकारने बँकेच्या गव्हर्नरपदी मर्जीतली माणसं बसवून हे पैसे रिजर्व बँकेकडून ओरबडून घेतलेत असं म्हणणं वावगं ठरणार नाही. याशिवाय रिजर्व बँकेकडील राखीव निधी आर बी आय बँकेच्या छत्रछायेखाली काम करत असलेल्या देशातील विविध बँका आणि बँका नसलेल्या आर्थिक रसद पुरविणाऱ्या कंपन्यांना मध्येच काही आर्थिक संकट आले तर त्यांना सावरण्यासाठी राखीव निधी म्हणून ठेवलेले असतात.



## आर या पार

डॉ. शांताराम कारंडे

१५ ऑगस्ट १९४७ पासून ते २०१४ पर्यंत स्वातंत्र्यानंतरच्या ६४ वर्षांच्या कालावधीत भारत सरकारवर चोपन्न लाख करोड रुपयांचे कर्ज होते. मोदी सरकारच्या केवळ पाच वर्षांच्या किमयेमुळे सरकारवरील कर्जात तब्बल अठ्ठावीस लाख करोड रुपयांची वाढ होऊन सरकारवरील एकूण कर्ज ८२ लाख करोड रुपयांपर्यंत पोहचलेले आहे.




भारताच्या अशा कर्जबाजारी परिस्थितीमुळे आणि घटलेल्या टॅक्स रेव्हेन्यूमुळे सरकार इच्छा असूनसुद्धा पेट्रोल किंवा डिझेल वरील टॅक्स कमी करू शकत नाही. जर टॅक्स कमी केला तर सरकारचे खर्च आणि उत्पन्न यातील तफावत वाढून फिक्सल डेफिसिट वाढेल. त्यामुळे फिक्सल डेफिसिट कमी करण्यासाठी आणि भाषणातील घोषणा पूर्ण करण्यासाठी रिजर्व बँकेच्या बॅलन्स शीट मधील पैसे काढून घेण्याची राक्षसी कल्पना सत्ताधारी राक्षसांच्या डोक्यात आली. पण हा प्रकार देशासाठी खूप घातक सिद्ध होऊ शकतो.

भविष्यात दुर्दैवाने आपल्या देशावर सुनामी, भूकंप, नैसर्गिक आपत्ती, मोठा दुष्काळ, युद्धजन्य परिस्थिती, अन्न-धान्य टंचाई, साथीचे आजार, रोगराई अशी नैसर्गिक अथवा अनैसर्गिक संकटे आलीच तर तेव्हा त्यावेळेस ही परिस्थिती हाताळण्यासाठी खूप साऱ्या पैशांची गरज भासू शकते. अशा वेळेस आंतरराष्ट्रीय स्तरावर कर्ज काढून निधी उपलब्ध केला जातो. अशा आणीबाणीच्या प्रसंगी वर्ल्ड बँक किंवा इतर जागतिक दर्जाच्या बँकिंग अँड फायनांशीअल इन्स्टिट्यूट एखाद्या देशाला कर्ज देताना आपल्या पंतप्रधानांनी दुसऱ्या देशाच्या पंतप्रधानांच्या गळ्यात गळे, हातात हात घालून काढलेले फोटो पाहून आणि अनिवासी भारतीयांसमोर ठोकलेली भाषणे आणि त्या भाषणातील टाळ्यांचा कडकडाट पाहून कर्ज किंवा मदत देत नाही, तर त्या देशाकडे किती परकीय चलन आहे आणि त्या देशातील केंद्रीय बँकेत किती पैसे आहेत यावर त्या कर्जदार देशाची पत (क्रेडिट ) ठरवतात. आणि त्यानुसार त्या देशाला कर्ज दिले जाते.

सध्या क्रूड ऑइलचे भाव मागील १० वर्षांच्या सरासरीपेक्षा खूपच कमी आहेत ही भारतासाठी जमेची बाजू आहे. क्रूड ऑइल चे भाव वाढले की सरकारी तिजोरीवर अजून ताण वाढणार आणि त्यामुळे रुपया अजून घसरू शकतो, त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑइल चे भाव स्थिर राहो अशीच प्रार्थना करायला हरकत नाही.

मात्र मोदी सरकारने सध्या रिजर्व्ह बँकेकडून पैसे घेऊन एकप्रकारे आपल्या देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर पत (क्रेडिट) कमी करून ठेवली आहे. रिजर्व्ह बँकेचा गळा घोटण्याचे धारिष्ट्य अंगात नसल्यामुळे आरबीआयचे अगोदरचे दोन गव्हर्नर रघुराम राजन आणि उर्जित पटेल यांनी त्या कारणामुळेच आपले राजीनामे दिले. आता येत्या काही वर्षांत हळूहळू ठइख ला भिकेला लावल्यानंतर सरकारकडील गेल्या कित्येक वर्षांत कमावलेले ४०० बिलिअन डॉलर चे विदेशी चलन आहेत त्यांना मोदी सरकार कधी घोडा लावतोय याचीच वाट बघावी लागेल. डॉलर च्या तुलनेत पडणारा रुपया सावरण्यासाठी सरकारला परकीय चलनाची विक्री करावी लागते, त्यामुळे भविष्यात आपल्याकडचे परकीय चलन देखील प्रमाणापेक्षा कमी झाले तर आश्चर्य वाटून घेऊ नका.

मोबाईल नं. ९८२०१ ५८८८५
dr.shantaramkarande@gmail.com

### संपादक मंडळ

■ **पंढरीनाथ पवार** संपादकीय सल्लागार ■ **डॉ.शांताराम कारंडे** संपादक ■ **जयवंत बामणे** कार्यकारी संपादक
■ **सहसंपादक :** रविंद्र राजुस्कर, दत्तात्रय गोतिसे, रोहीदास बनसोडे, डॉ गणेश बोरकर, मारुती शिवदास
■ **उपसंपादक :** श्रीमती सरोज बिसुरे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर,

हे ई-मासिक वृत्तपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मुद्रक, संपादक डॉ.शांताराम कारंडे यांनी प्रकाशक मे. सिध्दांत प्रकाशनातर्फे २२१/६, गीतगुंजन, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई- ६७ येथून डिजिटली प्रकाशित केले. संपादकीय सल्लागार : पंढरीनाथ पवार email : adhikrutrcm@gmail.com (अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

# तामलवाडी येथे सरस्वती विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय येथे शाळा बंद आंदोलन





**तुळजापूर (प्रतिनिधी) :** दि.१८ डिसें. २०२० रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ व शिक्षण संस्था चालक यांच्यावतीने शाळा बंद आंदोलन छेडण्यात आले . महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र शासनाने दि.११ डिसें. २०२० रोजी एक जाचक आदेश काढून चतुर्थ श्रेणी श्रेणी कर्मचाऱ्यांच्या सेवा कायमस्वरूपी संपवून शिक्षण क्षेत्रात कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा घाट महाराष्ट्र शासनाने घातला आहे, सदर चा आदेश रद्द करण्यासाठी व शाळा अनुदान आणि इतर मागण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात शाळा बंद आंदोलन आज दिनांक १८ डिसें. २०२० वार शुक्रवार या रोजी महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष मा. विजय नवल पाटील यांच्या आदेशानुसार उस्मानाबाद जिल्हा शिक्षण संस्था चालक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष. श्री. सुधीर आण्णा पाटील. यांच्या मार्गदर्शनानुसार तुळजापूर तालुकाध्यक्ष व त्र्यंबकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ तामलवाडी तालुका तुळजापूर संचलित सरस्वती माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय. तामलवाडी. ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद चे अध्यक्ष. मा बसवणप्पा मसूते व संस्था सचिव यशवंत अण्णा लोंढे यांच्या प्रयत्नाने संपूर्ण तुळजापूर तालुक्यातील शाळा बंद आंदोलन छेडण्यात आले. यावेळी सरस्वती माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य. सुभाष जाधव पर्यवेक्षक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**लातूर :** दि.६ भारतीय घटनेचे शिल्पकार ,परम पुज्य भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६४ व्या महापरिनिर्वाण दिनानिमीत्य राष्ट्रीय चर्मकार महासंघ लातूर जिल्ह्याच्या वतीने अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी जिल्हाध्यक्ष बिभीषण सांगवीकर, माजी जिल्हाध्यक्ष अनिल कबाडे, जिल्हा सचिव प्रविणआण्णा नाबदे सह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थिती होते.

# अत्याचारप्रकरणी नराधमांना कठोर शिक्षा द्या

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाची मागणी, तुळजापूर येथे तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी** | तामलवाडी



राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यात मामाच्या गावी राहणाऱ्या युवतीचे गावातील चार नराधमांनी अपहरण करुन अत्याचार केला. हे अमानुष कृत्य करणाऱ्या नराधामांना कठोर शिक्षा करण्याची मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने करण्यात आली.

यासंबंधी तुळजापूर येथे तहसीलदारांना राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की,

या अमानुष कृत्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार तसेच प्रदेशाध्यक्ष माधव रावजी गायकवाड, प्रदेश कार्याध्यक्ष शांताराम कारंडे यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण महाराष्ट्रात १२ नोव्हेंबर रोजी निदर्शने करण्यात आली. या प्रकरणातील आरोपींवर जलदगती न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच पीडितेच्या कुटुंबाचे पुनर्वसन शहरात करण्यात यावे. त्यांना पोलिस संरक्षण देण्यात यावे. ज्या पोलिसांनी पीडितेचा मृत्यूपूर्व जबाब घेतला नाही त्यांना सहआरोपी करुन त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. जिल्हाधिकारी, तहसील कार्यालय जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी तुळजापूर, पोलिस ठाणे तामलवाडी येथे निवेदन देण्यात आले. यावेळी प्रभाकर जाधव, राज्य कार्यकारिणी सदस्य, राष्ट्रीय चर्मकार महासंघ महाराष्ट्र राज्य, नितीन शेरखाने युवक प्रदेशाध्यक्ष, विकास गायकवाड माजी जिल्हाध्यक्ष, ड गणपती कांबळे जिल्हा अध्यक्ष ,बबन वाघमारे जिल्हा सचिव, पांडुरंग म्हेत्रे जिल्हा युवक कार्याध्यक्ष, केरनाथ कांबळे तालुका अध्यक्ष तुळजापूर, खंडू रोकडे युवक तालुकाध्यक्ष तुळजापूर आदींची उपस्थिती होती.

# संघर्षातून घडलेले सामाजिक कार्यकर्ते गजानन भटकर



**अकोला प्रतिनिधी :** अकोला तालुक्यातील बोरगांव मंजू येथील छोट्याशा अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या गजानन भटकर यांनी अत्यंत संघर्षाचे दिवस पाहिले आहेत. आधीपासूनच त्यांना समाजकार्यांची आवड होती. मात्र जेमतेम आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. गजानन भटकर यांच्या समाजकार्याची सुरुवात १९८५ सालापासून झाली. यादरम्यान शिक्षण सुरु असताना अकोल्यामध्ये त्यांनी शिवणकाम शिकून घेतले. टेलरिंग करत त्यांनी एस.एस.सी. आणि आयटीआयचे शिक्षण पूर्ण केले. आयटीआय झाल्यानंतर वेल्डींगचे वर्कशॉप सुरु केले. त्याच सोबत समाजकार्याला देखील वाहून घेतले. संत रोहिदास जयंती आदी कार्यक्रम आयोजित करत त्यांनी चर्मकार समाजातील लोकांना एकत्र केले.

१९९१ मध्ये राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर अॅड. प्रकाश आंबेडकर व मखराम पवार यांच्यासोबत पषमध्ये वेगवेगळ्या पदांवर कार्य केले. १९९५ मध्ये माजी मंत्री तथा समाजाचे नेते बबनराव घोलप यांच्या नेतृत्वात संघटनेच्या कामाची जबाबदारी स्वीकारली.

गजानन भटकर हे सध्या राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष व कॅबिनेट सल्लागार समिती सदस्य व विदर्भ अध्यक्ष म्हणून आपली जबाबदारी पार पाडत आहेत. राजकीयदृष्ट्या ते भाजपामध्ये असून तेथे विविध पदे भूषवित आहेत.

# चर्मकार महिलांवरील अत्याचार प्रकरणी नराधमांना फासावर लटकवा!

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाची मागणी

**अमरावती प्रतिनिधी :** कोल्हापूर आणि जळगाव जिल्ह्यात घडलेल्या चर्मकार मुलीवर अत्याचार प्रकरणी शासनाने फास्ट ट्रॅक न्यायालयात दावा दाखल करून आरोपी असलेल्या नराधमांना त्वरित फासावर लटकवा अशी मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याणमंत्री बबनराव घोलप साहेब यांच्या आदेशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या नेतृत्वाखाली सदर निवेदन अमरावती जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.



महाराष्ट्रात चर्मकार समाजाच्या मुलीवर कोल्हापूर जिल्ह्यात राधानगरी तालुक्यात २० वर्षीय मुलीवर अत्याचाराची घटना घडली असून जळगाव जिल्ह्यात पारोळा तालुक्यात २० वर्षीय तरुणीवर बलात्कार करुन विष पाजून खून करण्यात आला आहे. कोल्हापूर आणि जळगाव या दोन जिल्ह्यातील अत्याचाराच्या घटना घडल्या असून एका मुलीचा प्राण गेला आहे. तसेच गेल्या वर्षात अशा प्रकारच्या अनेक निंदनीय घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या मुळे या घटनेने महाराष्ट्र हादरला असून या निंदनिय घटनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करीत आहोत असे राष्ट्रिय प्रवक्ते रविंद्र राजुसकर यांनी वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

आरोपीना कडक शासन करुन लवकरात लवकर फासावर लटकवा अशी मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केली. त्यावेळी रा.का. सदस्य श्यामभाऊ आकोडे,विभागिय संघटक राजेंद्र तांबेकर,जिल्हा सचिव विजय शेकोकार,अचलपुर तालुका अध्यक्ष मनोहर कोथळकर,जिल्हा उपाध्यक्ष रमेश सरोदे सह कार्यकर्ते उपस्थित होते.




# अत्यंत महत्वाचे

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ

(महाराष्ट्रीय चर्मकार संघ)

प्रति,
राष्ट्रीय / राज्य / जिल्हा पदाधिकारी
**विषय : संघटनेचा खर्च सर्वांनी मिळून उचलणेबाबत**

महोदय,
आपणास कळविण्यात येत आहे की, आपल्या नासिक येथील पार पडलेल्या बैठकीत ठरविण्यात आले होते की आपण आपल्या संघटनेच्या भवितव्यासाठी वेबसाईट बनविण्यासाठी तसेच इतर बाबींसाठी पुढाकार घेऊन प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी खालील प्रमाणे आपले योगदान द्यावे.

१) राष्ट्रीय पदाधिकारी - रु. ५,०००/-
२) राज्य व विभागीय पदाधिकारी- रु. ३,०००/-
३) जिल्हा पदाधिकारी - रु. २,०००/-

तरी आपणास विनंती आहे की, आपण आपल्या पदाप्रमाणे रक्कम खालील बँक अकाऊंट मध्ये जमा करावे.

Account Holder Name:
Maharashtriya Charmkar Sangh
account No.: 04750100021345
Bank Name: Bank Of Baroda
Branch Name.: Nasik Road. Nashik
IFSC Code: BRB0NSIKR
(BRB नंतर ५ वा शब्द ओ नसून शून्य (०) आहे)

कृपया आपल्या सहकार्याची अपेक्षा!

आपला नम्र,

**बबन घोलप** - संस्थापक / अध्यक्ष
**पंढरीनाथ पवार** - राष्ट्रीय प्रमुख सल्लागार
**माधव गायकवाड** - प्रदेशाध्यक्ष
**डॉ. शांताराम कारंडे** - प्रदेश कार्याध्यक्ष
**दत्तात्रेय गोतीसे** - राज्य सचिव
**राष्ट्रीय चर्मकार महासंघ**

## न्यु सुंदर फुटवेअर शोरुमच्या उद्घाटन प्रसंगी माधवराव सूर्यवंशी यांना शुभेच्छा

**लातूर प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील चाकूर येथे १९७५ पासून ग्राहकांच्या सेवेत सुंदर फुटवेअर हे दुकान सुरू होते.या दुकानाला ४५ वर्ष पूर्ण झाली असून नवीन आज न्यु सुंदर फुटवेअर मल्टी ब्रँन्ड शोरुम चे शानदार उद्घाटन संपन्न झाले.

शोरुमचे मालक तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष माधवराव सुर्यवंशी यांनी चाकूर येथे फुटवेअरचे शोरुम सुरु केल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष बिभीषण सांगवीकर,राष्ट्रीय चर्मकार शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष धर्माजी उदबाळे,पोलिस जमादार राजेंद्र कांबळे यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी माजी जि.प.सदस्य विठ्ठलराव माकणे,साईराज सुर्यवंशी,गौरव सांगवीकर उपस्थित होते.



## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना विनम्र आवाहन!

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक, अध्यक्ष माननीय बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली आपण आपल्या जिल्ह्यात, तालुक्यात, विभागात विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असता. त्या उपक्रमांचे, कार्यक्रमांचे फोटो आणि बातम्या
adhikrutrcm@gmail.com
या ईमेलवर पाठवावेत. त्यांना नि:शुल्क प्रसिध्दी दिली जाईल.
हा उपक्रम महासंघाच्या प्रचार आणि प्रसारार्थ आहे याची आपण सर्व पदाधिकाऱ्यांनी दखल घ्यावी आणि सहकार्य करावे, हि नम्र विनंती.

**संपादक : डॉ. शांताराम कारंडे**
९८२०१५८८८५

## बिंग फुटले

### सद्गुरुंची दिक्षा

एका बेलदाराने आपल्या गाढवाला कुठल्याही शेतात निर्वेध चरता यावे म्हणून एक युक्ती केली. त्याने सिंहाचे कातडे पैदा केले. रोज अंधार पडल्यावर कातडे गाढवावर पांघरूण तो गाढवाला चरायला सोडी. त्याला सिंह समजून कोणताही पशू त्याच्या आसपास फिरकेना आणि माणसांनी तर या सिंहाचा धसकाच घेतला. सिंहाचे कातडे पांघरलेले हे गाढव बरेच दिवस कुणाच्या लक्षात आले नाही. शेतात जरी हे गाढव शिरले तरी ते दिसताच भीतीने झोपडीचे दार लावून शेतकरी गप्प बसू लागले. एकदा शेतात मनसोक्त चरून गाढव कंटाळले व ते एका उकिरड्यावर गेले. तेथे आणखी दोन गाढवे उकिरडा फुंकत होती. या सिंहरूपी गाढवाला पाहून ती उधळली आणि ओरडत सुटली. ती ओरडल्यावर सिंहाचे कातडे पांघरलेले गाढवही ओरडू लागले. त्याचे ते ओरडणे ऐकून गावकऱ्यांना या सिंहाचे कोडे सुटले. त्यांनी लाठ्या-काठ्या घेऊन गाढवास यथेच्छ बडवून काढले. गाढवाबरोबर त्याच्या मालकालाही गावकऱ्यांनी ठोकून काढले व त्याला गावाबाहेर हाकलून लावले.

**तात्पर्य :**
**लोकांना फसविणे काही काळ जमले तरी केव्हा ना केव्हा बिंग फुटतेच.**


काय ???



अधिकृत RCM *ईमासिकाचे वार्षिक सभासद व्हायचंय?*
मग वाट कसली बघताय? लगेच संपर्क साधा :
आर.सी.एम. प्रचार आणि प्रसार विभाग :
९८२०१५८८८५ / ७७२२०७९१२५